# विधि व न्याय

## १. सीआर/५१३/ठाणे/१४

फिर्यादी यांनी श्री भारत व कपिल भंडारे यांच्या विरुध्द कोणगाव पो.ठाणे, जिल्हा ठाणे येथे गुन्हा दाखल केला असून त्या खटल्याची सुनावणी जेएमएफसी भिवंडी कोर्टात चालू आहे. सरकातर्फे आरोपी लोकसेवक किरण बळवंत काकडे, सहा. सरकारी अभियोक्ता, वर्ग—१, हे सरकारी वकील म्हणून काम पहात होते. फिर्यादी हे साक्षकामी न्यायालयात गेले असता केस लवकर चालवून फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी केसचे प्रत्येक तारखेस रु.१०००/— लाचेची मागणी करुन दिनांक १८/०६/१४ रोजी सकारी वकीलांच्या कार्यालयाबाहेर आलोसे काकडे यांनी रु.१०००/— लाचेची रक्कम स्वीकारली.

सदरबाबत शांतीनगर पो.स्टे., ठाणे शहर गु.र.नं. २७/२०१४, ला. प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना आरोपी खाजगी इसमासह अटक करण्यात आली आहे.

## २. सीआर/५४८/सोलापूर/१४

फिर्यादी हे सोलापूर जिल्हा, मोहळ तालूक्यातील रहिवाशी असून राज्य परिवहन मंडळामध्ये कंडक्टर आहेत. त्यांच्याविरुध्द मनी कलेक्टरची केस झाली होती. त्याबाबत त्यांचेवर बडतर्फीची नोटीस काढण्यात आली होती. सदर बडतर्फी नोटीस विरुध्द फिर्यादी यांनी औदयोगीक व कामगार न्यायालयात अपिल दाखल केले आहे. आरोपी लोकसेवक दिलीप पंढरीनाथ मराठे हे राज्य परिवहन महामंडळ सोलापूर येथे विधि अधिकारी म्हणून कामगार न्यायालयात कार्यरत आहेत. फिर्यादी यांच्या अपिलाचा निकाल त्यांचेबाजूने लागावा या कारणासाठी आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडे रु. ४०००/— लाचेची मागणी केली. दिनांक २५/०७/२०१४ रोजी आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडून रु. ४०००/— लाचेची रक्कम स्वीकारली. परंतू आलोसे यांना संशय आल्याने त्यांनी लाच रक्कमेच्या नोटा खिडकीबाहेर फेकून दिल्या, तेव्हा आलोसे यांना पकडण्यात आले.

सदरबाबत जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर, भाग—६, गु.र.नं. ३०५४/२०१४ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ सह कलम २०१, ५११ भादंवि अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## ३. सीआर/२८९/बीड /१४

फिर्यादी हे बीड जिल्हा, तालूका आ टी येथे रहावयास असून त्यांचेवर दिनांक १८/०१/२००८ रोजी आष्टी पोलीस ठाणे, जिल्हा बीड येथे गुरनं. ९/२००८ कलम ३५३, ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हाचे दो ाारोप पत्र न्यायालयात दाखल होवून केसची सुनावणी सुरु झाली होती. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील आरोपी लोकसेवक शेख मोहम्मद अस्लम रहेमशाामियॉ हे केसचे काम पहात होते. दिनांक ०३/०४/२०१४ रोजी आ टी न्यायालयात फिर्यादी हे त्यांचे केसचे संदर्भात हजर झाले असता फिर्यादी यांना आलोसे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून केसचा निकाल विरोधात जाणार असल्याने मदत करण्यासाठी फिर्यादी यांचेकडे रु. ५०००/— लाचेची मागणी केली. तडजोडीअंती रु. २०००/— देण्याचे ठरले. त्याप्रमाणे दिनांक ०९/०४/२०१४ रोजी पंच व साक्षीदारासमक्ष रु. २०००/— लाचेची मागणी करुन आलोसे यांनी स्वीकारली असताना रंगेहात पकडण्यात आले.

सदरबाबत आष्टी पोलीस ठाणे गुर.क्र.३०१४/१४ कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## ४. सिआर/१२०/वर्धा/१५

फिर्यादी यांचेविरुद्ध प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी कोर्टात दाखल प्रकरणात विद्यमान न्यायालयाने फिर्यादीस निर्दोष सोडले होते. सदर फौजदारी प्रकरण चालविणारी आरोपी लोकसेवक तथा विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता भावना अण्णाजी जगताप, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी कोर्ट, वर्धा हिने तक्रारदाराला केसमधुन निर्दोष सोडण्याकरीता साक्ष पुरावा तक्रारदाराचे बाजुने घेतला असे म्हणुन या कामाचा मोबदला व न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुद्ध अपिल न करण्याकरीता रु.५,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. ०५/०२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक भावना अण्णाजी जगताप हिला तडजोडी नंतर तक्रारीकडुन रु.४,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो. पो.स्टे. वर्धा शहर, जि. वर्धा येथे अप.क्र. ३०२६/१५ कलम ७, १३(१)(ड), १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.